महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोंकण भवन, सहावा माळा,
नवी मुंबई ४००६१४
दिनांक:- 3 FEB 2006

कार्यालयीन आदेश क्र.स्था-१८/व/ प्रशासन /एएसडी-४ / ७ अ, दिनांक ३/२/२००६

असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक निधी लेखा विभागातील लेखापरीक्षणाचे काम प्रलंबित असल्यामुळे अनेक उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) हे कर्मचा-यांची एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात व-याचदा अमर्याद कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करतात. सदर बाब नियम बाह्य व मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाने पूर्वी निर्गमित केलेल्या कार्यालयीन आदेशांच्या विसंगत आहे.

अशा प्रकारे एका जिल्हयातील कर्मचारी दुस-या जिल्हयात मोठ्या प्रमाणावर वा प्रदिर्घ नियुक्त केल्याने शासनाला प्रवास भत्त्यावर अतिरिक्त खर्च करावा लागतो तसेच वरिष्ठ कार्यालयाचे पदस्थापनेचे आदेश निष्प्रभावीत करण्याची कृती नकळत उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) कार्यालयातून होत आहे. त्यामुळे याप्रकरणी यापूर्वी मुख्य कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेले याविषयीचे कार्यालयीन आदेश व सुचना रद्द करून आता पुढील प्रमाणे एकत्रित आदेश देण्यात येत आहेत.

१. लेखापरीक्षणाच्या प्रलंबित व नियमीत कामासाठी कर्मचा-यांची केली जाणारी तात्पुरती नियुक्ती ही एकावेळेस ३० दिवसापेक्षा व एका आर्थिक वर्षात एकूण ४५ दिवसापेक्षा जास्त नसावी. हयापेक्षा अधिक काळ अशी नियुक्ती देण्यासाठी मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील.

२ जिल्हयांतर्गत /कार्यालयांतर्गत स्थानिक निधी लेखा विभागाकडील कर्मचा-यांना ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये व उपरोक्त मर्यादेतच देता येवू शकेल.

३. तात्पुरत्या नियुक्तीवर कर्मचारी पाठवितांना शक्यतो कार्यालयातील पदावरील जेष्ठतेप्रमाणे विचार करणेत यावा. तसेच शक्यतो सर्व कर्मचा-यांचा अशा तात्पुरत्या नियुक्तीवर पाठविण्यासाठी चक्रीय पध्दतीचा अवलंब करावा.

४. स्थानिक निधी लेखा विभागामधील अन्य जिल्हयातील प्रलंबित लेखापरीक्षण निपटारा करण्यासाठी शक्यतो स्थानिक निधी लेखा विभागातील कर्मचा-यांनाच पाठविण्यात यावे.

५ अन्य ठिकाणाच्या प्रलंबित कामासाठी तात्पुरत्या नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी अन्य कर्मचा-यांची नियुक्ती करता येणार नाही.

६. तसेच एका जिल्हयातून अन्य जिल्हयात नियुक्ती करतांना शक्यतो नजिकच्या जिल्हयातील कर्मचा-यांचा विचार करावा. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी जाण्यासाठी एखादा कर्मचारी स्वेच्छेने तयार असल्यास त्याचा उपरोक्त अटी व शर्तींच्या अधिन राहून प्राधान्याने विचार करावा.

उपरोक्त कार्यपध्दतीप्रमाणे कर्मचा-यांना तात्पुरत्या नियुक्तीवर पाठवितांना कर्मचा-यांची कोणतीही तक्रार येणार नाही याकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे.

विभागात कर्मचा-यांना एका वर्षात घेण्यात आलेल्या अशा नियुक्तीबाबतचा सहामाही अहवाल सोबतच्या नमुन्यात या कार्यालयास सादर करावा.

(सी.जी.पवार)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

१. उपमुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ),
स्थानिक निधी लेखा,
मुंबई /पुणे /नाशिक /अमरावती /औरंगाबाद /नागपूर

२. उपमुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
जिल्हा---------

वि.ASB-४l com-३ ४२०६